पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती ( विशेष सभा )**

कार्यपत्रिका क्रमांक - १

**सभावृत्तांत**

दिनांक - **१५/०४/२०१७** वेळ - सकाळी **११.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पहिली सभा (विशेष सभा) शनिवार दिनांक **१५/०४/२०१७** रोजी सकाळी **११.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस **मा.श्री.सुनिल पाटील, (भा.प्र.से.)** संचालक, संचालनालय, भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.सोनवणे शारदा हिरेन
२. मा.अश्विनी संतोष जाधव
३. मा.भोईर सुरेश शिवाजी
४. मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत
५. मा.यादव मीनल विशाल

या शिवाय मा.डोईफोडे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.इंदलकर, मा.बोदडे - सहा.आयुक्त, मा.लावंड – कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा संचालक, संचालनालय, भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा** – सन्मा.सदस्य, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत मा.विधी समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन प्राधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणुक केलेली आहे.

मुक्त व निर्भयपणे मा.विधी समितीच्या सभापती पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**नगरसचिव यांना सभेचे कामकाज सुरु करण्याचे आदेश देतो.**

(मा.सभापती, विधी समिती यांची निवड करण्यासाठी कार्यपध्दतीची माहिती देण्यात आली)

**मा.नगरसचिव -** मा.विधी समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३० (३) नुसार नेमणूक करणे.

मा.विधी समिती सभापती पदाकरीता मुदतीत दाखल झालेले एक नामनिर्देशनपत्र मा.पिठासीन प्राधिकारी यांचेकडे सुपुर्त करण्यात येत आहे.

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा संचालक, संचालनालय, भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा** - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सभापती, विधी समिती पदाकरीता एकच नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झाले आहे. त्यामध्ये उमेदवार त्यांचे सुचक, अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | मा.सोनवणे शारदा हिरेन | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | मा.भोईर सुरेश शिवाजी |

( या नंतर या नामनिर्देशन पत्रांवर उपस्थित सदस्यांना काही आक्षेप असल्यास त्यासाठी वेळ देण्यात आला.)

मा.सभापती, विधी समितीचे पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त एक नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली असून ते नामनिर्देशनपत्र वैध ठरले आहे. त्यामध्ये मा.विधी समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.सोनवणे शारदा हिरेन** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

( उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा.पिठासीन प्राधिकारी यांजकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल अशी कायद्यात तरतूद आहे. उमेदवारी मागे घेण्यासाठी कालावधी देणेबाबत विचारणा केली असता उपस्थित सन्मा.सदस्यांनी एकच नामनिर्देशन पत्र असल्याने उमेदवारी मागे घेण्यासाठी कालावधी न देता पुढील कार्यवाही करणेबाबत सुचविले.)

मा.सभापती, विधी समिती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.सोनवणे शारदा हिरेन** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.सोनवणे शारदा हिरेन** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विधी समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

----------

ठराव क्रमांक - १ विषय क्रमांक – १

दिनांक - १५/०४/२०१७ विभाग – नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समिती सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या एक नामनिर्देशन पत्रामधील मा.विधी समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.सोनवणे शारदा हिरेन** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.सोनवणे शारदा हिरेन** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **विधी समितीचे सभापती पदावर** रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

---------

**सही/-**
**( सुनिल पाटील )**
पिठासीन प्राधिकारी तथा
संचालक, संचालनालय,
भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा
विधी समिती (विशेष सभा)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

----------

( नवनिर्वाचित सभापती **मा.सोनवणे शारदा हिरेन** यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

**मा.नगरसचिव** - विषय क्र.२ - मा.विधी समिती उपसभापतीची नेमणूक करणे.

मा.विधी समितीचे उपसभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेले एक नामनिर्देशनपत्र मा.सभापती यांचेकडे सुपुर्द करणेत येत आहे.

**मा.सभापती** - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उपसभापती, विधी समिती पदाकरीता एकच नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झाले आहे. त्यामध्ये उमेदवार त्यांचे सुचक, अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| **०१** | **मा.अश्विनी संतोष जाधव** | **मा.भोईर सुरेश शिवाजी** | **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे** |

( या नंतर या नामनिर्देशन पत्रांवर उपस्थित सदस्यांना काही आक्षेप असल्यास त्यासाठी वेळ देण्यात आला.)

मा.उपसभापती, विधी समितीचे पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त एक नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली असून ते नामनिर्देशनपत्र वैध ठरले आहे. त्यामध्ये मा.विधी समिती उपसभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.अश्विनी संतोष जाधव** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

(उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा.सभापती यांजकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल अशी कायद्यात तरतूद आहे. उमेदवारी मागे घेण्यासाठी कालावधी देणेबाबत विचारणा केली असता उपस्थित सन्मा.सदस्यांनी एकच नामनिर्देशन पत्र असल्याने उमेदवारी मागे घेण्यासाठी कालावधी न देता पुढील कार्यवाही करणेबाबत सुचविले.)

मा.उपसभापती, विधी समिती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.अश्विनी संतोष जाधव** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.अश्विनी संतोष जाधव** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विधी समितीचे उपसभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

----------

ठराव क्रमांक - २ विषय क्रमांक - २

दिनांक - १५/०४/२०१७ विभाग - नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समिती उपसभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या एक नामनिर्देशन पत्रामधील मा.विधी समिती उपसभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.अश्विनी संतोष जाधव** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित

उमेदवार असल्याने **मा.अश्विनी संतोष जाधव** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **विधी समितीचे उपसभापती पदावर** रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

---------

ठराव क्रमांक - ०३ विषय क्रमांक - ०३
दिनांक - १५/०४/२०१७
सुचक : मा.अश्विनी जाधव अनुमोदक : मा.मीनल यादव

मा.विधी समितीची सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिस-या शुक्रवारी दुपारी ३.०० वा. विशेष समिती सभागृहात भरविण्यात यावी. तथापी सदर दिवशी कार्यालयास सुट्टी/सुट्टया असलेस त्या सुट्टी / सुट्टयांनंतर येणारे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३.०० वा. सभा भरविण्यात यावी. तसेच कोणीही सन्मा.सदस्य उपस्थित नसल्याने होऊ न शकणारी सभा मा.सभापती निश्चित करतील त्या दिवशी व त्या वेळी भरविण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(मा.सोनवणे शारदा हिरेन)**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७२७/२०१७
दिनांक : १५/०४/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.